महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-ब (शिक्षण सक्षमीकरण शाखा) मधील अधिव्याख्याता संवर्गात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या उमेदवारांना नियुक्ती देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन आदेश क्रमांक : ससेप्र-४४१७/प्र. क्र.२४०/प्रशा-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- २ मे, २०१८

वाचा:-

१. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे पत्र क्र.१५(३)(३)/११२४/दहा, दिनांक ३०.१.२०१७
२. शासन आदेश क्रमांक : ससेप्र-४४१७/प्र. क्र. ४४/प्रशा-२, दिनांक ४.०८.२०१७, दिनांक २५.०९.२०१७ व दिनांक २.०४.२०१८.
३. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे पत्र क्र.१५(३)(३)/११२४/दहा, दिनांक ९.०८.२०१७
४. शासन आदेश क्रमांक : ससेप्र-४४१७/प्र. क्र.१६७/प्रशा-२, दिनांक २२.०२.२०१८
५. शासन आदेश क्रमांक : ससेप्र-४४१७/प्र. क्र.२४०/प्रशा-२, दिनांक २३.०२.२०१८
६. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे पत्र क्र.१५(३)(३)/११२४/दहा, दिनांक ५.०१.२०१८

प्रस्तावना-

महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-ब (शिक्षण सक्षमीकरण शाखा) मधील अधिव्याख्याता संवर्गातील सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त असलेल्या पदांकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने संदर्भाधीन पत्रान्वये एकूण ११० पैकी १०९ उमेदवारांची शासनास शिफारस केलेली होती. भटक्या जमाती- (ड) प्रवर्गातील उमेदवाराचे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने एका पदाचा निकाल राखून ठेवण्यात आला आहे. शिफारस प्राप्त १०९ उमेदवारांपैकी ११ उमेदवारांची ज्येष्ठ अधिव्याख्याता (गट-अ) पदावर नियुक्ती झाली आहे व ५ उमेदवारांनी नियुक्ती स्वीकारली नाही. उर्वरित ९३ उमेदवारांपैकी ८७ उमेदवारांच्या नियुक्तीचे आदेश दिनांक ४ ऑगस्ट, २०१७ रोजी व उर्वरित ५ उमेदवारांच्या नियुक्तीचे आदेश दिनांक २५ सप्टेंबर, २०१७ (३ उमेदवार), दिनांक २२ फेब्रुवारी, २०१८ (१ उमेदवार) व दिनांक २ एप्रिल, २०१८ (१ उमेदवार) रोजी निर्गमित करण्यात आले आहेत. १०९ उमेदवारांपैकी एकूण ९२ उमेदवारांचे नियुक्तीचे आदेश काढण्यात आले असून, एका उमेदवाराने नियुक्तीस नकार दिला आहे.

२. अधिव्याख्याता, गट-ब पदासाठी नियुक्ती न केलेल्या १६ उमेदवारांऐवजी प्रतिक्षासूचीवरील उमेदवारांची शिफारस करण्याबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगास विनंती करण्यात आली होती. आयोगाने पाठविलेल्या शिफारशीनुसार प्रतिक्षासूची वरील १६ उमेदवारांना नियुक्ती देण्याबाबतचे आदेश दिनांक २३ फेब्रुवारी, २०१८ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत. अधिव्याख्याता पदावरील नियुक्ती आदेश निर्गमित केल्यानंतर हजर न झालेल्या १३ उमेदवारांऐवजी प्रतिक्षासूचीवरील उमेदवारांची शिफारस करण्याबाबत आयोगास दिनांक १७.०७.२०१७ च्या पत्राद्वारे

विनंती करण्यात आली. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने प्रतिक्षासूची वरील १३ उमेदवारांपैकी, मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांनी रिट पिटिशन क्रमांक १०८९३/२०१७ मध्ये दिलेल्या आदेशानुसार अमागास प्रवर्गातील एक पद रिक्त ठेवून १२ उमेदवारांची शिफारस शासनास केली आहे. सदर उमेदवारांकडून सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १५ जून, २०१७ च्या सुधारित महसूल विभाग वाटप नियमानुसार पसंतीचा महसूली विभागाचा विकल्प मागविण्यात आला होता. सदर अधिसूचनेनुसार महसूली विभागाचे वाटप उमेदवारांना केल्यानंतर त्यांना त्यांच्या महसूली विभागात पदस्थापना देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर उमेदवारांना वेतन बँड रू.९३००-३४८००(ग्रेड वेतन रू.४४००/-) या वेतन संरचनेतील अधिव्याख्याता या संवर्गातील स्तंभ क्रमांक (६) मध्ये नमूद पदावर नियुक्ती देण्याचा निर्णय घेतला आहे.

अनु क्र.	नाव	उमेदवाराचा प्रवर्ग	निवड झालेल्या पदाचा प्रवर्ग	दि.१६ जून, २०१७ च्या अधिसूचनेन्वये वाटप केलेला महसूली विभाग	पदस्थापनेचे ठिकाण
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
१	श्री. नरवडे उमेश अच्युत	अमागास	अराखीव असलेल्या पदासाठी	औरंगाबाद	जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था, जि. नांदेड
२	श्री. पंडित मिलिंद अशोक	इ.मा.व.	इ.मा.व.साठी राखीव असलेल्या पदासाठी	नाशिक	जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था, जि. धुळे
३	श्री. कडाळे विलास प्रकाश	इ.मा.व.	अराखीव असलेल्या पदासाठी	अमरावती	जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था, जि. अमरावती
४	श्रीमती पुजारी सुलभा आप्पासाहेब	भ.ज.(क) महिला	भ.ज.(क) (महिला) वर्गवारीच्या राखीव असलेल्या पदासाठी	पुणे	जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था, जि. सांगली
५	श्री. टोणे रामदास भिमराव	इ.मा.व.	अराखीव असलेल्या पदासाठी	कोकण	जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था, जि. रायगड
६	श्री. राठोड भाऊराव चंदू	वि.जा. (अ)	वि.जा. (अ) वर्गवारीसाठी राखीव असलेल्या पदासाठी	नागपूर	जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था, जि. गोंदिया

७	श्री. वसावे सुभाष बावा	अ.ज.	अ.ज. वर्गवारीसाठी राखीव असलेल्या पदासाठी	कोकण-१	जिल्हा शैक्षणिक सात्तत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था, जि. सिंधुदुर्ग
८	श्री. जमादार दिलीप शिवदास	अ.ज.	अ.ज. वर्गवारीसाठी राखीव असलेल्या पदासाठी	औरंगाबाद	जिल्हा शैक्षणिक सात्तत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था, जि. बीड
९	श्रीमती तिटकारे राजश्री खंडू	अ.ज.	अ.ज. (महिला) वर्गवारीसाठी राखीव असलेल्या पदासाठी	पुणे	जिल्हा शैक्षणिक सात्तत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था, जि. सातारा
१०	श्रीमती पवार सारीका रामसिग	अ.ज.	अ.ज. (महिला) वर्गवारीसाठी राखीव असलेल्या पदासाठी	नागपूर	जिल्हा शैक्षणिक सात्तत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था, जि. भंडारा
११	श्री. कुमार दत्तू पाटील	भ.ज. (क)	अराखीव असलेल्या पदासाठी	कोकण-२	जिल्हा शैक्षणिक सात्तत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था, जि. ठाणे (तात्पुरती नियुक्ती)
१२	श्री. पंचभैय्ये विजय उत्तमराव	अ.ज.	अ.ज. वर्गवारीसाठी राखीव असलेल्या पदासाठी	औरंगाबाद	जिल्हा शैक्षणिक सात्तत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था, जि.उस्मानाबाद (जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्यानंतर)

३. सदर पदस्थापना खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

(१) उपरोक्त तक्त्यातील अनुक्रमांक ११ येथील श्री. कुमार दत्तू पाटील यांना सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : चारित्र्य-२११७/प्र.क्र.४८३/२०१७/१६-अ, दिनांक २८ ऑगस्ट, २०१७ नुसार "तात्पुरती नियुक्ती" देण्यात येत आहे. सदर नियुक्ती ही कमाल ६ महिन्याच्या कालावधीपुरती राहील व त्यानंतर ती आपोआप संपुष्टात येईल. श्री. कुमार पाटील यांच्या चारित्र्य प्रमाणपत्र पडताळणी अहवालात त्यांच्याविरूध्द मिरज ग्रामिण पोलीस ठाणे, जि.सांगली येथे गु रं न.९१/२०१७ भादंविस-४९८(अ), ३२३, ५०४, ५०४६, ३४ नुसार गुन्हे दाखल असल्याबाबत पोलीस अधीक्षक, सातारा यांनी कळविले आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २६ ऑगस्ट, २०१४ च्या शासन परिपत्रकानुसार अपर मुख्य

सचिव, गृह विभाग यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीने जर श्री. कुमार पाटील यांना शासन सेवेत घेण्यास शिफारस केल्यास व त्यास शासनाची मान्यता मिळाल्यास श्री. कुमार पाटील यांची नियुक्ती परिविक्षाधीन अधिकारी म्हणून करण्यात येईल. मात्र, सदर समितीने, श्री. कुमार पाटील यांचेवरील गुन्ह्यांचे स्वरूप विचारात घेऊन अधिव्याख्याता पदावर नियुक्ती देण्यास अपात्र करण्याची शिफारस केल्या व सदर शिफारस शासनाने मान्य केल्यास श्री.कुमार दत्तू पाटील यांची तात्पुरती नियुक्ती कोणत्याही क्षणी संपुष्टात आणण्यात येईल.

(२) उपरोक्त तक्त्यातील अनुक्रमांक १२ येथील श्री. विजय उत्तमराव पंचभैय्ये यांनी त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र अद्याप शासनास सादर केलेले नाही. त्यामुळे जात वैधता प्रमाणपत्र शासनास सादर केल्यानंतरच श्री. विजय पंचभैय्ये यांना पदस्थापनेच्या ठिकाणी प्रत्यक्ष रूजू होता येईल. याबाबत संबंधित नियंत्रण अधिकारी व कार्यालय प्रमुख यांनी योग्य ती दक्षता घ्यावी.

(३) राज्याच्या प्रशिक्षण धोरणाच्या अनुषंगाने सदर उमेदवारांना विहीत पायाभूत प्रशिक्षण पूर्ण करणे आवश्यक राहील. सदर प्रशिक्षण संचालक, विद्या प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत आयोजित करण्यात येईल. तसेच सदर प्रशिक्षणाचा कालावधी व रूपरेषा ठरविण्याचे अधिकार संचालक, महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना राहतील.

(४) सदर नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारांचा परिविक्षा कालावधी दोन वर्षाचा राहील. सदर उमेदवारांची पहिली वेतनवाढ त्यांच्या एक वर्षाचा परिविक्षा कालावधी पूर्ण झाल्यानंतर व त्यानंतरची वेतनवाढ त्यांनी परिविक्षा कालावधी पूर्ण केल्यानंतर देण्यात येईल.

(५) परिविक्षा कालावधीत सदर उमेदवारांना प्रचलित नियमाप्रमाणे आवश्यक असणारी विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. तसेच परिविक्षा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण करणे आवश्यक राहील. परिविक्षा कालावधीत त्यांनी कामाचा अपेक्षित दर्जा प्राप्त न केल्यास किंवा विहीत विभागीय परीक्षा उत्तीर्ण न केल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता, त्यांच्या सेवा समाप्त करण्यात येतील.

(६) उपरोक्त उमेदवार यापूर्वी हिंदी व मराठी भाषेच्या परीक्षा उत्तीर्ण झालेले नसल्यास किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसल्यास त्या परीक्षा विहीत मुदतीत उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. तसे न झाल्यास संबंधित उमेदवारांची वेतनवाढ रोखून ठेवण्यात येईल.

(७) महाराष्ट्र नागरी सेवा (जेष्ठतेचे विनियमन) नियमावली, १९८२ व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात येणाऱ्या सुधारणांच्या अधिनतेने सदर उमेदवारांची जेष्ठता राहील. सदर उमेदवारांनी त्यांच्या नियुक्तीच्या पदावर आदेशाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत

रुजू व्हावयाचे आहे. त्यानंतर रुजू होण्यास आलेल्या उमेदवारास रुजू करुन घेण्यात येणार नाही. काही अपरिहार्य कारणास्तव उमेदवारास रुजू होण्यास मुदतवाढ हवी असल्यास तसे सकारण लेखी कळवून मुदतवाढ घेणे आवश्यक आहे. मुदतवाढीसंदर्भात विहित ३० दिवसाच्या कालावधीत मुदतवाढीबाबतचे आदेश निर्गमित न झाल्यास उमेदवाराच्या मुदतवाढीची विनंती अमान्य केल्याचे गृहीत धरण्यात यावे. तसेच मुदतवाढ दिलेल्या उमेदवाराच्या बाबतीत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या गुणवत्ता क्रमांकानुसार जेष्ठता मिळणार नाही व असे उमेदवार मुदतवाढ दिलेल्या मुदतीत ज्या दिनांकास हजर होतील, त्या दिनांकापासून त्यांची जेष्ठता धरण्यात येईल.

(८) वित्त विभागाचे शासन निर्णय क्र.अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१ ऑक्टोबर २००५ नुसार परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेतील तरतुदी सदर उमेदवारांना लागू राहतील. तसेच दिनांक १ नोव्हेंबर २००५ पूर्वी शासन सेवेत निवृत्ती वेतनार्ह आस्थापनेवर कार्यरत असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांबाबत वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक : अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दिनांक १८ ऑगस्ट, २००९ मधील तरतुदी सदर उमेदवारांना लागू राहतील.

(९) संबंधित उमेदवारांनी त्यांच्या शैक्षणिक अर्हतेबाबत व इतर आवश्यक प्रमाणपत्राच्या मूळ प्रती तपासणीकरीता व साक्षांकित प्रतींचा संच पदस्थापना स्विकारण्याच्या वेळी संबंधित कार्यालय प्रमुख/ नियंत्रण अधिकारी यांच्याकडे सादर कराव्यात आणि कार्यालय प्रमुख/ नियंत्रण अधिकारी यांनी प्रमाणपत्रांची तपासणी करून संबंधित उमेदवाराला रुजू करून घ्यावे.

(१०) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने संबंधित उमेदवारांनी सादर केलेली सर्व कागदपत्रे संबंधित सक्षम यंत्रणेमार्फत तपासण्याच्या सूचना केलेल्या आहेत. त्यामुळे तपासणीअंती उमेदवारांनी सादर केलेली कागदपत्रे खोटी अथवा बनावट आढळल्यास त्यांच्या सेवा कुठलीही पूर्व सूचना न देता तात्काळ संपुष्टात आणण्यात येतील.

(११) संबंधित उमेदवारांनी या आदेशाच्या दिनांकापासून ३० दिवसात नियुक्तीच्या पदावर रुजू व्हावे. विहीत कालमर्यादेत रुजू न होणाऱ्या उमेदवारांना सदर नियुक्तीमध्ये स्वारस्य नसल्याचे समजण्यात येईल आणि सदर नियुक्तीकरीता संबंधित उमेदवारांचा हक्क आपोआप संपुष्टात येईल.

(१२) महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्ती-साठी महसूली विभाग वाटप नियम,२०१५ मधील नियम क्रमांक ८ नुसार वरील उमेदवारांची ज्या महसूली विभागात नियुक्ती झाली आहे, त्या विभागात किमान ९ वर्षाचा सेवाकालावधी पूर्ण करणे आवश्यक राहील.

(१३) शासकीय सेवेत रुजू झाल्यानंतर ज्या उमेदवारांना शासकीय सेवेचा राजीनामा द्यावयाचा असल्यास त्यांनी एक महिन्याची पूर्वसूचना शासनास देणे आवश्यक राहील अन्यथा त्यांना एक महिन्याचे वेतन शासनाकडे जमा करावे लागेल.

(१४) उपरोक्त उमेदवारांना नियुक्तीच्या ठिकाणी उपस्थित राहण्यासाठी प्रवास भत्ता देण्यात येणार नाही.

(१५) वर नमूद केलेल्या अटी व शर्ती व्यतिरिक्त महाराष्ट्र शासनाच्या अधिकाऱ्यांना लागू असलेले प्रचलित नागरी सेवा विषयक सर्वसाधारण नियम सदर उमेदवारांना लागू राहतील.

(१६) मा. महाराष्ट्र प्रशासकिय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाखल करण्यात आलेल्या मूळ अर्ज क्रमांक ८२/२०१७ मधील अंतिम निर्णयाच्या अधिन राहून तात्पुरत्या स्वरुपात सदर पदस्थापना देण्यात येत आहे.

४. हे आदेश प्राप्त होताच संबंधित उमेदवाराने नियुक्तीच्या ठिकाणी हजर व्हावे व याबाबतचा अहवाल संबंधित कार्यालय प्रमुखांनी आयुक्तांमार्फत शासनास सादर करावा.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्रमांक २०१८०५०२१७४९३०७५२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ravindra Pralhad Ate

Digitally signed by Ravindra Pralhad Ate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sport Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fd5fc4fce5f6732e6657dca817ae6ee619a55d170d3c93eff53c3ca69d1a772d, serialNumber=eaa37af2edb5809b000f33d26328f6cdac80ee32afdac3f68b5821d14e41dffa, cn=Ravindra Pralhad Ate
Date: 2018.05.02 17:54:41 +05'30'

(र. प्र. आटे)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

सर्व उमेदवार

प्रत,

१. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा,
३. महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर
५. सर्व आयुक्त, महानगरपालिका
६. संचालक, महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
यांना सदर उमेदवारांच्या पायाभूत प्रशिक्षणासंदर्भातील कार्यवाही तात्काळ करण्याच्या विनंतीसह.
७. सर्व संचालक
८. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई

९. सर्व प्राचार्य, जिल्हा शैक्षणिक सात्तत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था,
१०.सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
११.सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक / निरंतर),
१२.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१३.उपसचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग, ५ १/२, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०० ०२१ (पत्राव्दारे)
१४.सर्व सहसचिव / उपसचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५.सर्व अवर सचिव / कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. निवडनस्ती / प्रशा-२ कार्यासन.

प्रत माहितीस्तव :-

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
४. मा. विरोधी पक्षनेते (विधानसभा / विधानपरिषद) यांचे स्वीय सहायक
५. मा. विधानसभा सदस्य / मा.विधानपरिषद सदस्य यांचे स्वीय सहायक
६. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक